## आरती १

आरती साईबाबा । सौख्यदातारा जीवा । चरणरजातळीं ।
द्यावा दासां विसांवा । भक्तां विसावा ॥ धृ.॥
जाळुनियां अनंग । स्वस्वरुपीं राहे दंग । मुमुक्ष जनां दावी ।
निजडोळां श्रीरंग । डोळां श्रीरंग ॥१॥
जया मनीं जैसा भाव । तया तैसा अनुभव । दाविसी दयाघना ।
ऐसी तुझी ही माव । तुझी ही माव ॥२॥
तुमचें नाम ध्यातां । हरे संसृतिव्यथा । अघाध तव करणी ।
मार्ग दाविसी अनाथा । दाविसी अनाथा ॥३॥
कलियुगीं अवतार । सगुणब्रह्म साचार । अवतीर्ण जाहलासे ।
स्वामी दत्त दिगंबर । दत्त दिगंबर ॥४॥
आठां दिवसां गुरुवारीं । भक्त करिती वारी । प्रभुपद पहावया ।
भवभय निवारी । भय निवारी ॥५॥
माझा निज द्रव्यठेवा । तव चरणरजसेवा । मागणे हेंचि आतां ।
तुम्हां देवाधिदेवा । देवाधिदेवा ॥६॥
इच्छित दीन चातक । निर्मल तोय निजसुख । पाजावें माधवा या ।
सांभाळ आपुली ही भाक । आपुली ही भाक ॥७॥

## आरती २

ॐ साई श्री साई जयजय साईराम देवा, जयजय साईराम ।
सुखदाई है नाम तुम्हारो सावले घनश्याम ॥ धृ.॥
संकट नाशक पिडाहारक नाम तुम्हारो साई देवा, नाम तुम्हारो साई ।
दासभक्तका रक्षन करना काज तुम्हारो साई ॥१॥
ॐ साई श्री साई जयजय साईराम देवा, जयजय साईराम ।
सुखदाई है नाम तुम्हारो सावले घनश्याम ॥ धृ.॥
मै ना जानू जप तप यागा सबकुछ मेरे साई देवा, सबकुछ मेरे साई ।
चिंता भयका नाश करेगा रखवाला श्री साई ॥२॥
ॐ साई श्री साई जयजय साईराम देवा, जयजय साईराम ।
सुखदाई है नाम तुम्हारो सावले घनश्याम ॥ धृ.॥
पथ बिसरेको राह दिखाता दयावान गुरु साई देवा, दयावान गुरु साई ।
जिस जिस पथपर भक्त साईका वहां खडा है साई ॥३॥
ॐ साई श्री साई जयजय साईराम देवा, जयजय साईराम ।
सुखदाई है नाम तुम्हारो सावले घनश्याम ॥ धृ.॥